दिनांक :- 19/02/2022

# <u>प्रेस नोट</u>

## हदगाव येथील व्यापाऱ्यास 25 लाखाची खंडणी मागणाऱ्या आरोपीना स्थानिक गुन्हे शाखेकडुन अटक

दिनांक 07/02/2022 रोजी हदगाव येथील श्रीनिवास दमकोंडवार यांना अज्ञात आरोपीने फोनकरुन मुलास मारण्याची धमकी देवुन 25 लाख रुपयाची खंडणी मागीतलेली होती. त्यावरुन पोलीस ठाणे हदगाव गुरनं. 35/2022 कलम 384 , 507 भा द वि प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेवुन अटक करण्याबाबत मा. प्रमोद शेवाळे ,पोलीस अधीक्षक , नांदेड यांनी पोलीस निरीक्षक स्थागुशा नांदेड यांना आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक स्थागुशा , नांदेड यांनी स्था. गु. शा. येथील अधिकारी व अमंलदार यांचे पथक तयार केले होते.

दिनांक 19/02/2022 रोजी फोनवरुन धमकी देवुन खंडणी मागणारे इसमाबाबत खात्रीशिर माहीती श्री व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांना मिळाल्याने त्यांनी स्थागुशाचे अधिकारी व अमंलदार यांना नमुद इसमास पकडुन चौकशी करण्यासाठी रवाना केले. स्थागुशाचे पथकानी हदगांव येथील मुलागल्ली , हदगाव येथे जावुन हदगाव येथील **1) उस्मान शाह ऊर्फ दादु पिता फत्ता शाह वय 23 वर्षे व्यवसाय मजुरी रा. मुलागल्ली , हदगाव 2) करीमोद्दीन अजिमोद्दीन काझी वय 71 वर्षे व्यवसाय मजुरी रा. मुलागल्ली , हदगाव व 3) शेख रहीम पिता अबुबकर सिध्दीकी वय 24 वर्षे व्यवसाय मजुरी रा. मुलागल्ली, अदाचौक हदगाव** यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता , त्यांनी दिनांक 07/02/2022 रोजी हदगाव येथील श्रीनिवास दमकोंडवार यांना 25 लाख रुपये दे नाहीतर तुझ्या दोन्ही मुलाना खतम करतो अशी धमकी दिली होती असे सांगीतले. त्यावरुन स्थागुशाचे पथकाने त्यांना ताब्यात घेवुन गुन्हयात वापरलेला मोबाईल दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आला असुन मोबाईल व आरोपीतांना पोलीस ठाणे हदगाव यांचे ताब्यात गुन्हयाचे तपासकामी देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री प्रमोद शेवाळे, पोलीस अधीक्षक, नांदेड, मा. श्री निलेश मोरे अपर पोलीस अधीक्षक, नांदेड , मा. श्री विजय कबाडे , अपर पोलीस अधीक्षक ,भोकर , श्री व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि पांडुरंग भारती , पोउपनि आशिष बोराटे, पोहेकॉ/ गंगाधर कदम , पो ना /सजिंव जिंकलवाड , बालाजी तेलंग , विठल शेळके , पोकॉ / विलास कदम , महेश बडगु, राजु सिटीकर, यादगीरवाड , रवि बाबर , चालक/अर्जुन शिंदे यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पो. अ. कार्यालय नांदेड**